■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २६२ ■ मंगळवार दि.१० जून २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 262 ■ Tuesday Dt.10 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# बीड जिल्ह्यातील खाजगी सावकारी आयुष्य उध्द्वस्त करी, व्याजाच्या त्रासामुळे घेतला जातो टोकाचा निर्णय!

## बीड जिल्ह्यात खाजगी सावकारांची दादागिरी; खाजगी सावकार मोकाट?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



# जिल्ह्यात अवैध सावकारी तेजीत, सावकारी कर्जापोटी शेतकऱ्यांकडून शेकडा पंधरा टक्के दराने वसुली?

## बँकांकडून पीक कर्ज वाटपास उशीर; त्वरित पैशासाठी शेतकरी अवैध सावकारांच्या जाळ्यात?



- खाजगी सावकारकी बेततेय शेतकऱ्यांच्या जीवावर; सावकारी रोखण्याचे पोलिस प्रशासनासमोर आवाहन?
- पोलीस अधीक्षक कॉवत साहेब, खाजगी सावकारांचा पर्दाफाश करून एकदा दणका द्याच?
- गोरगरिबांच्या जीवावर गडगंज संपत्ती कमावणाऱ्या खाजगी सावकारांची आयकर विभागाने तपासणी करावी?

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील अवैध सावकारी शेतकऱ्यांच्या जिवावर उठली आहे. कधी ओला तर कधी कोरडा दुष्काळ, निसर्गाच्या असमतोलामुळे नापिकी, होणारे नुकसान, त्यात काही बँकांकडून पीक किंवा अन्य वैयक्तिक कर्जाला आखडता हात, मिळणाऱ्या कर्जाचीही संथगतीने होणारी प्रक्रिया यामुळे शेतकऱ्यांना पेरणी, आजारपण, मुलांचे लग्न किंवा शिक्षण यासाठी अवैध सावकारांकडे जावे लागत आहे. शेतकऱ्यांची हीच निकड अवैध सावकारांसाठी लुटीचा धंदा बनली आहे. जिल्ह्यात महिन्याला शेकडा ५ ते १५ टक्के व्याजदराने अवैध सावकारकी सुरू आहे. हा त्रास असह्य झाल्याने शेतकरी, व्यापारी आत्महत्या करत आहेत. शेतकरी अवैध सावकारांकडे जाण्याचे कारण म्हणजे पेरणीवेळी खते, बियाण्यांना तातडीने पैसे उपलब्धता व वेळेवर न मिळणारे पीक कर्ज, वैयक्तिक कर्ज तसेच निसर्गाच्या असमतोलामुळे खर्चाच्या तुलनेत उत्पन्न कमी प्रतिष्ठेमुळे कर्ज काढून मुलींचे विवाह, मुलांचे शिक्षण, घरातील आजारपण तसेच इत्यादी खर्चासाठी शेतकऱ्यांना पैशाची गरज असते यामुळे शेतकरी तातडीने पैसे उपलब्ध व्हावेत म्हणून या खाजगी सावकारांच्या जाळ्यात अडकत आहेत. जिल्ह्यात या अवैध सावकारीचा नंगानाच सुरू आहे.

या सावकारीच्या जाचाला कंटाळून तसेच अनेक शेतकरी तसेच तरुण वर्ग मोठ्या संकटात असल्याचे बोलले जात आहे. अवैध सावकारीचा पर्दाफाश पोलीस प्रशासनाने करावा अशी मागणी होत आहे. अशा अवैध सावकारी मुळे शेतकऱ्यांचा अनेकांची आर्थिक आणि मानसिक स्थिती खराब होत चालली आहे. शिवाय या सावकारी मुळे शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ असून आत्महत्या देखील होत आहेत. यामुळे अनेकांचे कष्टमय जीवन आणखी वेदनादायी बनत आहे. सावकाराकडून घेतलेली कर्जाची मोड रक्कम चुकवता येत नाही. त्यानंतर धमक्यांचे सत्र सुरू होते, काहींना मोठ्या प्रमाणावर जमीन किंवा संपत्ती विकून या फासातून सुटावे लागत आहे. परंतु अत्यंत गरीब असलेल्यांना हे शक्य नाही त्यांचे जीवन अवैध सावकारी करणाऱ्यांच्या ताब्यात जात आहे. जिल्ह्यात अवैध सावकारी करणाऱ्यांवर पोलीस प्रशासनाने तगादा लावणे गरजेचे आहे. महिन्याला पाच ते पंधरा टक्के व्याजाप्रमाणे अवैध सावकारी सुरू आहे. व्याज दिला नाही तर गलिच्छ भाषा वापरली जाते. तसेच जवळ असलेल्या गाड्या जमिनी जप्त करण्याच्या धमक्या दिल्या जातात. यामुळे पोलीस प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन जिल्ह्यातील अवैध सावकारी करणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी. अवैध सावकारी करणाऱ्यांचा कर्जाचा फास घट्ट होत आहे. यामुळे अनेक जणांना या सावकारीच्या सापळ्यात अडकून त्यांची जमीन घरे आणि संपत्ती गमावी लागत आहे.

सध्या स्थितीत अशा अवैध सावकारी मुळे महिलांचे शोषणही सुरू झाली आहे. कधी कधी कर्ज न दिल्याने महिलांना मानसिक आणि शारीरिक त्रास दिला जातो. या सर्व संकटामुळे लोकांवर तणाव वाढत आहे. ज्यामुळे

▶ पान २ वर

## पोटात दुखत असल्याने शौचास जाऊन येते असे म्हणून गेलेल्या विवाहीत महिलेने विहीरीत उडी मारून संपविले जीवन

गेवराई । प्रतिनिधी



**गेवराई तालुक्यातील एरंडगाव येथील घटना**

शेतात शेतमजुर महिला घेऊन कापूस लागवड करण्यासाठी गेलेल्या गेवराई तालुक्यातील एरंडगावातील विवाहित महिलेने विहीरीत उडी मारून आत्महत्या केल्याची घटना काल दुपारी अकरा वाजेच्या सुमारास घडली. वर्षा ओम लाखे (वय ३५) रा.एरंडगाव ता.गेवराई जि.बीड असे या विवाहीत महिलेचे नाव आहे. सोमवारी वर्षा लाखे ही महिला आपल्या सासूसह काही शेतमजुर महिलासह कापूस लागवड करत होत्या. सकाळी ११ वाजेच्या सुमारास वर्षा हिच्या पोटात दुखू लागल्याने तीने सासूला अन् शेतमजुर महिलांना शौचास जाऊन येते असे म्हणून गेली. मात्र, बराच वेळ होऊन देखील वर्षा परत आली नाही. म्हणून तिची सासू आणि महिला मजुर यांनी वर्षा--वर्षा म्हणून हाक मारल्या. परंतू प्रतिसाद मिळत नसल्याने सासूने शोध घेतला असता विहीरजवळ तिची चप्पल आढळून आल्याने तिने विहीरीत उडी मारली असा संशय सासूला आला. यावरून सासूने कुटुंबीयास माहीती दिली.

सायंकाळी पाच वाजेस गेवराई पोलीस घटनास्थळावर दाखल होऊन मृतदेह विहिरीच्या बाहेर काढण्यात आला. दरम्यान मृत वर्षाचा भाऊ

▶ पान २ वर

## पोहण्यास गेलेल्या तरूणाचा तलावात बुडून मृत्यू; आष्टी तालुक्यातील घटना

आष्टी । प्रतिनिधी




तालुक्यातील मायंबा सावरगाव येथे देवदर्शनासाठी आलेला तरूण इतर मित्रांसह तलावात पोहण्यासाठी गेला होता. अचानक दम लागल्याने बुडून मृत्यू झाल्याची घटना सोमवार ९ जून रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास घडली. ओमकार गोकुळ गडरी (वय–२२) रा.मेहुनबार ता.चाळीसगांव, जि.जळगांव असे या तरुणाचे नाव आहे. आठ दहा लोक गाडीत आले होते.

ओमकार गडरी हा तरूण मित्रांसह सोमवारी सकाळी आष्टी तालुक्यातील मच्छिंद्रनाथ देवस्थान येथे देवदर्शनासाठी आला होता. तो इतर तरूणा सोबत या ठिकाणी असलेल्या तलावात पोहण्यासाठी आला होता. दुपारी एकच्या सुमारास तळयामध्ये पोहण्यास उतरला. पोहताना अचानक तो पाण्यात गंटागळ्या खाऊ लागला व त्याला दम लागत असल्याने तो पाण्यात बुडत

▶ पान २ वर

## ग्रामपंचायत सदस्यासह युवकांचे मोबाईल टॉवरवर आंदोलन

### लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे

शिरूर कासार । प्रतिनिधी



तालुक्यातील आर्वी या गावासाठी मंजूर जलजीवन पाणीपुरवठा योजनेचे काम नियमबाह्य होत असून योजना थातूरमातूर करून ग्रामस्थांच्या तोंडाला पान पुसण्याचा प्रकार चालू असल्याने ग्रामपंचायत सदस्यांकडून प्रशासनाला अल्टिमेटम देऊन मोबाईल टावर वर चढून आत्मदहन करण्याचा इशारा एक महिन्यापूर्वी प्रशासनाला दिला होता प्रशासनाकडून यावर कुठलेही कार्यवाही न केल्याने युवक आंदोलनावर ठाम राहिले व एक मार्च च्या रोजी सकाळी युवक टावर वर चढले होते.

▶ पान २ वर

### ज्येष्ठ समाजसेवक दीपक नागरगोजे यांनी अधिकाऱ्यांना धरले धारेवर

आर्वी ग्रामपंचायत चा कारभार जेष्ठ समाजसेवक दीपक नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. गावातील जलजीवन पाणीपुरवठा योजनेस संदर्भात चक्क ग्रामपंचायत सदस्यांना आंदोलनाची वेळ येत असेल तर प्रशासकीय अधिकारी करतात तरी काय असा सवाल ज्येष्ठ समाजसेवक दीपक नागरगोजे यांनी आंदोलन स्थळावर उपस्थित अधिकाऱ्यांना विचारून धारेवर धरले होते.

### गुत्तेदाराची आंदोलनाकडे पाठ

बीड विधानसभा मतदार संघाचे लोकप्रतिनिधी संदीप क्षीरसागर यांचे निकटवर्तीय असलेले गुत्तेदार जालिंदर डावकर यांनी या युवकांच्या आंदोलनाकडे पाठ फिरवली हे आंदोलनाकडे फिरकले देखील नाही यामुळे ग्रामस्थांच्या मनात गुत्तेदारा विरोधात तीव्र संतापाची लाट यावेळी पाहण्यासाठी मिळाली.

## पिंपळनेरच्या अजय काळे यांनी कॉम्रेड मॅराथॉन स्पर्धा केली सर

बीड । प्रतिनिधी




अजय नामदेवराव काळे, पिंपळनेर, ता. जि. बीड येथील मूळ रहिवासी व सध्या पुणे येथे स्थायिक यांनी दि. ०८.०६.२०२५ रविवार रोजी दक्षिण आफ्रिका येथे संपन्न झालेल्या जगातील एक अवघड व प्रतिष्ठेची समजली जाणारी 'कॉम्रेड मॅराथॉन' स्पर्धेत सहभागी होत ९० कि.मी अंतर १० तास ३५ मिनिटात पूर्ण केली. जगातील सुमारे ७० देशातील २३ हजार धावपटुनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. पीटर्मारीजबर्ग ते डर्बन असा चढउताराचा हा मार्ग पार करतांना धावपटूचा कस लागतो. अजयने या स्पर्धेसाठी बरेच वर्ष मेहनत घेऊन हे यश संपादन केले, याबद्दल पिंपळनेर परिसरातील नागरिक, नातेवाईक व मित्र मंडळी यांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले.

## पॉवरग्रीड व साखर कारखान्यामधील साहित्य चोरणारी टोळी पकडली

### बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

बीड । प्रतिनिधी

मा. पोलीस अधीक्षक बीड यांनी बीड जिल्हयामध्ये चोरीच्या घटना होत असल्याने चोरी करणाऱ्या टोळीला पकडण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेला सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेने पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर दाखल गुन्हयातील मौजे शेपवाडी येथील पॉवरग्रीड येथील



१२,९५,०००/– किमतीचे ॲल्युमिनीयमचे साहीत्य चोरीस गेलेले होते व परळी वैजनाथ येथील साखर कारखाण्यामधील ६०,०००/–किमतीचे पितळी साहित्य चोरी गेले होते.

या गुन्हयांचा तांत्रिक विश्लेषन व समांतर तपास करीत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, आरोपी नामे १) शेख जावेद शेख हबीब व त्याचे साथीदार तसेच २) बंडू लक्ष्मण जोगदंड व त्याचे साथीदार या दोन्ही टोळयांनी चोरले आहे. त्या टोळी मधील आरोपी परळी येथे आहेत त्यावरुन लागलीच पोलीस निरीक्षक श्री शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी पोलीस उपनिरीक्षक श्री सुशांत सुतळे यांची टिम आरोपी शोध कामी परळी येथे रवाना

▶ पान २ वर

# चौसाळा बायपासवर होणाऱ्या वाटमाऱ्या थांबणार का?

## स्थानिक गुन्हे शाखेने लक्ष देवून या चोरांचा बंदोबस्त करावा

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हयातील सोलापुर -बीड महामार्गावरील चौसाळा बायपासवरती होत असलेल्या चोरया आणि लुटमारीच्या घटनेने परिसरात घबराटीचे वातावरण असुन चौसाळा बायपास वरती चालत्या व थांबलेल्या वाहनातुन मालाची चोरी, प्रवाशाना थांबवुन लुटमार करण्याचे प्रकार रोज घडत असल्यामुळे या परिसरातील नागरिक व प्रवशामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या महीनाभरापासुन या चौसाळा बायपासला चोरटयानी लक्ष केले असुन एकटा दुचाकी चालकाला लुटमारीच्या घटनातर अनेक घडल्या आहेत.

धाराशिव येथिल मोरे नामक दुचाकी चालकाला याच बायपासवरती मारहाण करुन रोख रख्खम काढून घेण्यात आली होती तर नांदुर चौसाळा रोडवरती दामत्याला लुटले होते तसेच चौसाळा येथिल सामाजिक चळवळीतील सक्रीय कार्यकर्ते विवेक कुचेकर याना देखील लुटण्याचा प्रयत्न या बायपास वरती झाला होता तर या बायपास वरून अनेक मालवाहु ट्रक जातात हे चोरटे चालत्या ट्रकवर चढुन ट्रकमधील सामान गायब करीत आहेत या बायपासवरती कुठलीच गोष्ट साध्य नाही झाली तर आसपास असलेल्या शेतकरी वर्गाचे गुरे किंवा शेतातील माल घेवून हे चोरटे पसार होत आहेत. गेल्या वीस दिवसापुर्वी चौसाळा



घारगाव रस्तयावरील पांडुरंग कळासे या शेतकऱ्याच्या दहा शेळया या चोरटयांनी चोरून घेवून गेले याचा तपास अधाप पर्यंत लागलेला नाही. चौसाळा बायपासवरील या चोरटयाचा धुमाकूळ थांबणार का? असा प्रश्न या भागातील नागरिक विचारताना पाहावयास मिळत आहे. आता स्थानिक गुन्हे शाखेनेच या चोरांचा बंदोबस्त करावा व चौसाळा बायपास चोरटयापासुन मुक्त करावा अशी मागणी सर्व सामान्य नागरिक करत आहेत.

# परिस्थितीवर मात करून यश मिळवता येते : मस्के

आष्टी । प्रतिनिधी

आपली परिस्थिती नाजूक आहे म्हणून जीवनात कधीच खसुन जायचं नसतं नेहमी प्रयत्न करत राहिला तर यश नक्की मिळते आपण शिक्षण घेत असताना आपली ध्येय व जिद्द या पर्यंत पोहोचण्यासाठी आपण सतत प्रयत्न करत राहणार गरजेचे असल्याचे प्रतिपादन सावरगाव तालुका आष्टी येथील सी आय एफ एस या सेवेतून सेवानिवृत्त झालेले अर्जुन मस्के यांनी आपल्या सेवापूर्ती सोहळयाच्या कार्यक्रमात आपले मत व्यक्त केले ते पुढे बोलताना म्हणाले की, माझ्या ४० ते ४१ वर्षाच्या सेवेत अनेक संकटाशी मला सामना करावा लागला परंतु मी न डगमगता सेवा केली.




आज सुखरूप मी मच्छिंद्रनाथाच्या कृपेने सेवानिवृत्त होत आहे असे ते म्हणाले, गावातून ढोल ताशाच्या गजरात त्यांची भव्य दिव्य अशी गावकऱ्यांनी मिरवणूक काढली होती या सभापती सोहळयाच्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सरपंच अरविंद मस्के होते. यावेळी प्रास्ताविक भाषण करताना माजी सैनिक घनश्याम मस्के यांनी आपले मत व्यक्त करताना ते म्हणाले की नोकरी कोणती असो ती करताना प्रामाणिक केली तर त्याचे फळ नक्की मिळते परंतु आज अर्जुन मस्के साहेब यांनी ४० ते ४१ वर्षाचा कार्यकाल चांगल्या प्रकारे सांभाळून असते सेवानिवृत्त होत आहेत हे राजस्थान वेस्ट बंगाल झारखंड गुजरात महाराष्ट्र, मध्य प्रदेश, बिसार अदि ठिकाणी त्यांनी सेवा केली. ते आमच्या गावचे भूषण असल्याचे ते म्हणाले.

या कार्यक्रम प्रसंगी मच्छिंद्रनाथ देवस्थानचे अध्यक्ष दादासाहेब पितळे सर, युवा नेते अशोकशेठ मस्के, प्रा. म्हातारदेव मस्के बाळासाहेब मस्के, नितीन चंदनाशिव, युवराज राऊत, बाबा सर, राजेंद्र मस्के, ज्ञानेश्वर गायके, बद्रीनाथ मस्के, मच्छिंद्र मस्के, मेजर देविदास मस्के, पत्रकार सुरेश कांबळे आदी मान्यवर गावकरी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोकशेठ म्हस्के यांनी केले तर आभारप्रदर्शन प्राध्यापक म्हातारदेव म्हस्के यांनी मांडले. यावेळी गावकऱ्यांच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे वचने त्यांना पुष्पगुच्छ घेऊन शपथ मी सत्कार करण्यात आला. नंतर आलेल्या मान्यवरांना अन्नदानाचे आयोजन त्यांनी केले होते.



बीड : आज दिनांक ९/६ /२०२५ रोजी बीड शहर पोलीस स्टेशनचे दबंग पोलीस निरीक्षक श्री शितल कुमार बल्लाळ साहेब यांचा समाजसेवक मुसाखान पठाण व पंकज वेदपाठक यांच्यातर्फे सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले त्याप्रसंगी सोबत डी बी पथक चे शहेनशाह भाई. मुकरमजान पठाण प्रसिद्ध व्यापारी नाजू बागवान श्री शितल कुमार बल्लाळ साहेब यांना शुभेच्छा देताना दिसत आहेत.



बीड : वटपौर्णिमा वडाच्या झाडाला फेऱ्या मारत साजरी करण्यापेक्षा वड पौर्णिमा वडाचे झाड लावून साजरी करण्याचा संदेश देणारा उपक्रम मातृभुमी प्रतिष्ठान बीड चे अध्यक्ष डॉ संजय तांदळे, लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे, नितीन जायभाये, महारुद्र बारगजे, गोरक्षनाथ तळेकर, जायभाये साहेब, दिपक राख यांच्यासह नवदाम्पत्य वैभव व प्रतिक्षा जायभाये यांच्या उपस्थितीत वडाचे झाड लावून उत्सव साजरा करण्यात आला.

# बोगस बियाणे विक्री करणाऱ्या कृषी केंद्रावर कायमची बंदी घालावी : बालाजी जगतकर

बीड । प्रतिनिधी

बालाजी जगतकर यांनी बोगस बियाणे विक्री करणाऱ्या कृषी केंद्रांवर योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली आहे. बीड येथील प्रतिनिधीच्या माहितीप्रमाणे, शेतकऱ्यांनी पेरणीपूर्वीच्या कामांमध्ये जोरदार तयारी केलेली असतानाच, बोगस बियाणे विक्रीचा सुळसुळाट सुरू आहे. जंगली बियाणे आणि चढ्या



भावाने खतांची विक्री होण्याच्या घटनेने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

शेतकऱ्यांचा पाऊस येण्याची अपेक्षा असून, बोगस बियाणे विक्रेत्यांवर कठोर कारवाई करून त्यांचे कृषी सेवा केंद्र कायमची बंद करणे आवश्यक आहे, जेणेकरून शेतकऱ्यांच्या आर्थिक नुकसानीपासून त्यांना वाचवता येईल. या संदर्भात बालाजी जगतकर यांनी सरकारच्या संबंधित कृषी विभागांकडे तात्काळ उपाययोजनांची मागणी केली आहे. अधिकार्यांनी या गंभीर समस्येकडे लक्ष देणे गरजेचे आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना योग्य दर्जाचे बियाणे आणि खतें मिळू शकतील.



आज मोदी बाग पुणे येथे निवासस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी २६ व्या वर्धापन दिनानिमित्त पक्षाचे संस्थापक, देशाचे नेते पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार साहेब यांना शुभेच्छा देताना मा.दिलीप गोरे मा.नगराध्यक्ष बीड, मा.पठाण फेरोज खान महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष अल्पसंख्याक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (श.प) व इतर मान्यवर दिसत आहे.



# ४०० किलो गोवंश जातीचे मांस जप्त करून आरोपीस अटक

## ए पी आय वर्षा व्हगाडेची सिंघम कारवाई

वडवणी । प्रतिनिधी

दिनांक ०८/०६/२०२५ रोजी दुपारी वडवणी पोलीस ठाणे हद्दीमध्ये उपळी या गावात एक इसम गोवंश जातीचे जनावरांची कत्तल करीत असल्याची गोपनीय माहिती वडवणी प्रभारी वर्षा व्हगाडे यांना मिळाली. त्यांनी तात्काळ मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी छापा मारला असता तेथे फिरोज सिकंदर कुरेशी वय ३५ वर्ष, राहणार उपळी हा त्याचे घरामध्ये गोवंश जातीची जनावरे कत्तल करताना मिळून आला.

पोलिसांनी घटनास्थळावरून ८० हजार रुपये किमतीचे ४०० किलो वजनाचे गोवंश जनावरांचे मांस, लोखंडी सुरे व लाकडी ओंडका जप्त केला. सध्या आरोपी अटकेत असून पुढील तपास सहाय्यक फौजदार विष्णू जायभाये करत आहेत. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत व अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांचे मार्गदर्शनाखाली वडवणी पोलीस ठाण्याच्या सहायक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे, पोलीस उपनिरीक्षक राजू राठोड, संदीप चव्हाण, पोलीस अंमलदार विष्णू खरात, किरण इरमले, वसंत करे यांनी केली.

# वट पौर्णिमा (महिला अस्मिता दिन)

वट पौर्णिमा हा सण स्त्रीयांसाठी फक्त उपवासाचा दिवस नव्हे तर हिंदू पतीव्रतेंच्या हृदयात अढळ स्थान असलेल्या सावित्रीच्या तत्त्वज्ञान, दृढनिश्चय, सुशिलता, त्याग सदाचार शालीनता पतीव्रता ह्या गुणांची स्वामीनी असलेल्या गुणवती कुळवती लावण्यवती सावित्री कडून शिकवण व अखंड आयुष्यभरासाठी प्रेरणा घेण्याचा दिवस म्हणजे वट पौर्णिमा.



आज तसा जास्तच उशिर झाला होता, रस्त्यावर एका ठिकाणी बायकांची खुप गर्दी होती बघतो तर फणसांचा ढीग पडला होता आणि बायका खरेदी करायला जणु तुटून पडल्या होत्या, ते पाहून मला आठवण झाली अरे वट-पौर्णिमा परवा मंगळवारी ना? आमच्या सावित्रीनं गेल्या आठवड्यात तसी तंबीच दिली होती की थोडी सुट्टी काढून घरी या वट-पौर्णिमा आहे.

तर या वट-पौर्णिमेचा सण म्हणजे सत्यवान सावित्री विषयी सर्वांना माहीतच आहे. अश्वपती नावाच्या राज्याला मुल-बाळ नव्हते तो निपुत्रीक होता त्याने तप करून सुर्याला प्रसन्न केले पुत्रवंत होण्याचा वरदान मागितला, सुर्याने पुत्री होईल असा आशिर्वाद दिला, पण आजच्या माणसांप्रमाणे त्याने हट्ट नाही केला की मला मुलगाच पाहिजे म्हणून, सूर्याच्या वरामुळे राजाला मुलगी झाली म्हणून नाव सावित्री. सावित्री खूप हुशार, गुणी आणि सर्व उपनिषदात निपुण होती त्याला आपल्या मुलीवर पूर्ण विश्वास होता म्हणूनच राजाने तीला तीच्या मणा सारखा पती निवडण्याचे स्वातंत्र्य दिले. तिने कित्येक राजकुमारातुन द्युमत्सेन राजाचा मुलगा सत्यवानाची निवड केली पण त्याच वेळी सत्यवानाचे वडिल राजा द्युमत्सेनाचे काही कारणाने राजवैभव गेले आणि दोन्ही राजा -राणी अंध झाली, पण तिने आपला निर्णय बदलला नाही स्वतः नारदाने तिला समजावले की सावित्री हा सत्यवान कितीही चांगला गुणवान असला तरी त्याचे आयुष्य फक्त १ वर्षेच आहे पण तिने सांगितले जे व्हायचे होते ते झाले आता काही बदल होणार नाही, हिंदू संस्कृती नुसार एकदा कुणाला पती म्हणून वरले मग दुसर्याचा विचारही करणे व्यभिचार. तर असी ही सावित्री अटल, अढल, सुलक्षणी पतीव्रता स्त्री लग्नानंतर राजवैभव गेल्यामुळे अगदी कैवल्य नेसुन पती सोबत अरण्यात अगदी सुखाने राहायला गेली पण आज-कालच्या मुलींप्रमाणे विचारही केला नाही की मी माहेरी किती वैभवात होते पालापाचोळयांच्या पर्णकुटीत तिने स्वर्ग अनुभवला, पती हाच परमेश्वर हाच सिद्धांत, सत्यवानाच्या अंतकाळाचा दिवस एक -एक करून जवळ येत होता, आणि तो काळ दिवस उजाडला, नित्यदिना प्रमाणे अग्नीहोत्रासाठी सुकी लाकडे आणायला जंगलात निघाला पण आज सावित्रीने पती सोबत जाण्याची सासू - सासर्याकडे याचना केली, त्याच्या परवानगीने ती जंगलात गेली. एका झाडावरील सुके लाकूड काढताना त्याला भोवल आली तो कसाबसा खाली उतरला सावित्रीच्या मांडीवर डोके ठेवून निपचिप पडला सावित्री आपल्या पदराने त्याला वारा घालु लागली, इतक्यात तिच्या समोर तेजस्वी कांतीचा रंगाने काळा महा भयंकर देव-पुरुष हातात फाशीचा दोर घेऊन रेड्यावर स्वार असा प्रकट झाला त्याच्या फासाच्या एका टोकाला सत्यवानाच्या पायाचा अंगठा अडकवून नेऊ पाहत होता, सावित्रीने न डगमगता प्रश्न केला हे देवा आपण कोण आहात आणि माझ्या पती ला आपण कुठे घेऊन निघालात यम म्हणाला हे सावित्री मी काळदेव यमराज, तुझ्या पतीचा जिवणकाळ संपला आहे. तुझ्या चारित्र्यशील तेज्यासमोर माझे यमदूत येऊ शकत नाहीत म्हणून मलाच स्वतः यावं लागलं इतक बोलुन यमराज सत्यवानाचे प्राण हरन करून दक्षिणेकडे निघाले पण सावित्रीने त्यांची पाठ सोडली नाही यमाने तिला खूप समजावले पण व्यर्थ त्याने सांगितले पतीचे प्राण सोडून काय पण माग तिने आपल्या सासू -सासर्याचे गेलेले वैभव आणि डोळे मागितले यमाने हे सर्व देऊन सुद्धा तिने यमाची पाठ नाही सोडली मग अजून काय माग म्हटल्यावर तिने आपल्या पित्याला पुत्र प्राप्तीचा वर मागितला ते देऊन सुद्धा ती थांबली नाही तेव्हा हताशपणे यम म्हणाले शेवटचा वर माग, तेव्हा सावित्री म्हणाली देवा दोन्ही कुळांसाठी मी मागितले आता माझ्यासाठी पूत्रवतीचा वर द्यावा यम घाई-घाईनं तथास्तु म्हणून पुढं जाऊ लागले पण चार पावले चालून तिथेच थबकले, त्याची चुक त्यांना कळाली पतीव्रता सावित्रीला पतीशिवाय मुले कशी होतील ते तिच्या चातुर्यावर प्रसन्न झाले आणि सत्यवानाला ४०० वर्ष आयुष्य व १०० पुत्र प्राप्तीचा आशिर्वाद दिला तो दिवस पौर्णिमेचा होता आणि ते झाड वडाचे, म्हणून स्त्रीया ह्या दिवशी आपल्या पतीच्या दिर्घायुषासाठी हा उपवास करतात.

भगिणीनो आपले अस्तित्व ओळखा, तुम्ही या भारतभुमीच्या पुत्री आहात या मातीतुन अनेक असामान्य शक्ती जन्माला आल्यात वीरमाता जिजाबाई 'विरांगणा राणी लक्ष्मीबाई, पतीव्रता सावित्री, सत्वशिल अनुसया, त्यागमुर्ति सिता नावे घेऊ तितकी कमी आहेत. नारी कधीच अबला नव्हती समाजातील कोणतीही ताकद तिला कमजोर करु शकत नाही, तिला एकच गोष्ट कमजोर करु शकते ते म्हणजे तिच आत्मबल ते आत्मबल खचऊ नका फक्त योग्य आचरण करा आणि त्या शक्तींचा आदर्श समोर ठेवा. ज्या माय-बहिणी ह्या वट-पौर्णिमेचा उपवास करणार आहेत त्यांना माझं इतकेच सांगन आहे जर तुम्ही तिचा उपवास करता तर तिच्या प्रमाणे आचरण करा, सावित्रीने राजवैभव गेल्यानंतरही झोपडीत राहून आपल्या अंध सासू- सासर्याची सेवा केली आजकालच्या सूनांप्रमाणे पतीला त्याच्या आई-वडिलांपासुन अलग नाही केले, सावित्रीने आपल्या सामर्थ्याच्या जोरावर पतीचे गेलेले प्राण आणले पण आपण प्राण नाही पण आपल्या, चारित्र्याचे रक्षण जरूर करू शकता, तुम्ही कुळाची मानमर्यादा, सासरच्या लोकांचा मानसन्मान आणि नवर्याची मर्यादा राखली तर तो खरा उपवास ठरेल.

तर अशी होती सत्वशिल पतीव्रता हूशार सावित्री तिने दोन्ही कुळाचा उद्धार केला, आणि त्याच श्रेय जाते ते तिच्या पित्याला त्याने मुलगाच पाहिजे असा विचार केला असता तर सावित्री जन्मलीच नसती पण आजकाल कित्येक सावित्र्या पोटातच मारल्या जातात, कुळाचा उद्धार कराण्यासाठी मुलगाच होणे जरुरी नाही, आपल्या मुलीला सावित्री सारखे आचरण चांगले संस्कार द्या. म्हणून मुलगी वाचवा मुलगी जगवा आणि तिला चांगली शिकवा, फुकट नाही म्हणत, मुलगी शिकली प्रगती झाली.

**अजय शिवकर**
**केळवणे पनवेल**
**७९७७९५०४६४**

पान १ वरून...

## जिल्ह्यात अवैध सावकारी तेजीत, सावकारी कर्जापोटी

काही लोक आत्महत्या देखील करत आहेत. अवैध सावकारी पासून मुक्तीसाठी पोलीस प्रशासनाने लक्ष घालणे गरजेचे आहे. अवैध सावकारी करणाऱ्यांच्या विरोधात पोलिसात तक्रार करायला कोणीही पुढे येत नाही. कारण अवैध सावकारी करणारे पैशाच्या जोरावर दहशत निर्माण करतात. यामुळे तक्रार करण्यासाठी लोक घाबरतात. तक्रार करायला पुढे येत नसल्याने अवैध सावकारी च्या सापळ्यात गुंतलेल्या लोकांवर आत्महत्या करण्याची वेळ आलेली आहे. अवैध सावकारी करणारे अवाजवी व्याज आकारले जातात. यातून कोट्यावधी रुपयांची उलाढाल करतात. जिल्ह्यात सुरू असलेली अवैध सावकारी तातडीने बंद करून त्यांच्यावर महाराष्ट्र सावकारी नियमानुसार कायदेशीर कारवाई करून त्यांच्या जवळील मालमतीच्या जप्तीची कारवाई करावी अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. तसेच अवैध सावकारी रोखण्याचे आव्हान पोलिस प्रशासनासमोर उभे आहे. तर पोलीस प्रशासन कारवाई करणार का हे देखील पाहणं तितकेच महत्त्वाचं ठरणार आहे.

## पोहण्यास गेलेल्या तरूणाचा तलावात बुडून मृत्यू

असल्याचे लक्षात येताच त्यांच्या मित्रांनी आरडा-ओरडा करण्यास सुरुवात केली. त्यामुळे आसपासचे लोक धावून आले आणि वाचविण्यासाठी पाण्यात उड्या घेतल्या. मात्र त्याचा शोध लागला नाही. घटनास्थळी आष्टी तहसिलदार वैशाली पाटील यांनी स्वतःभेट घेत पाहणी केली. सावरगावच्या स्थानिक तरुण पाण्यात उतरून सायंकाळच्या दरम्यान बूडालेल्या मृतदेहाचा शोध घेतला. घटनास्थळी अंभोरा पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक देवीदास सातव, पोलिस अंमलदार कृष्णा लव्हारे, होमगार्ड नवनाथ बोडखे आहेत.

## ग्रामपंचायत सदस्यासह युवकांचे मोबाईल टॉवरवर आंदोलन

बोगस जलजीवन पाणीपुरवठा योजनेची चौकशी करून योजना दर्जेदार करावी व योजनेतून टाळलेल्या वस्त्यांवर पाणीपुरवठा पाईपलाईन करावी या मागणीसाठी ग्रामपंचायत सदस्यांनी प्रशासनाच्या विरोधात आंदोलनाचे हत्यार उपसले होते. एक मार्च रोजी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास ग्रामपंचायत मधील सदस्य गोपाल भुसारे, गणेश भोसले, अरुण देवकाते, बळीराम मंडलिक, बप्पासाहेब काळे, उपसरपंच अरुण कुंभारकर सह रामेश्वर नागरगोजे, आयुब शेख व नितीन घरगिने हे युवक मोबाईल टावर वर चढले होते तब्बल तीन तासानंतर प्रशासकीय अधिकारी या ठिकाणी दाखल झाले होते. आंदोलन स्थळावर सरपंच मीरा यादव, ग्रामसेविका सीमा खेडकर, शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गणेश धोकृट, बिट अंमलदार जोगदंड यांच्यासह नायब तहसीलदार शिवनाथ खेडकर हे सर्व अधिकारी सकाळी नऊ वाजल्यापासून आंदोलन स्थळावर तळ ठोकून होते. पावणे बारा वाजण्याच्या सुमारास प्रशासकीय अधिकारी या ठिकाणी आले व आंदोलकांची समजूत काढून लेखी आश्वासन देऊन आंदोलन मागे घेण्यात आले.

### प्रशासकीय अधिकाऱ्यांनी एक महिन्याचा मागितला कालावधी

आर्वी गावातील जलजीवन योजनेचे रखडलेले काम पूर्ण करण्यासाठी ग्रामीण पाणीपुरवठ्याचे उपअभियंता एम.ए. शेख, एन.बी. सातपुते, एल.डी. हूले या अधिकाऱ्यांनी संबंधित गुत्तदाराला सूचना देऊन रखडलेले काम पूर्ण करण्यासाठी एक महिन्याचा अवधी आंदोलनकर्त्याकडून लेखी स्वरूपात घेतलेला आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी एक महिन्याच्या आत गावचा पाणीपुरवठा सुरळीत करण्याची संमती यावेळी दिली.

## विवाहीत महिलेने विहीरीत उडी मारून संपविले जीवन

याने शंका उपस्थित केल्याने मृतदेह बीडच्या शासकीय रुग्णालयात शवविच्छेदन दाखल करण्यात आला. दरम्यान, वर्षा लाखे हिने आत्महत्या कशामुळे केली याचे कारण समोर आले नसल्याने ते पुढील पोलीस तपासात निष्पन्न होईल असे गेवराई पोलिसांनी सांगीतले.

## पॉवरग्रीड व साखर कारखान्यामधील साहित्य चोरणारी टोळी पकडली

केली. तेथे जावुन टिमने आरोपीचा शोध घेतला असता मोठ्या शिताफीने यातील आरोपी । शेख जावेद हबीब, वय ३९ वर्ष, रा.बरकर नगर परळी वै. जि.बीड २. बंडु लक्ष्मण जोगदंड, वय ५० वर्ष, रा. रुमना जवळा ता. गंगाखेड, जि. परभणी ह.मु शिवाजीनगर परळी वै. ३. विजय नारायण जोगदंड, वय ४२ वर्ष, रा. भिमनगर परळी वे जि.बीड ४. शेख अब्दुल रौफ ईस्माईल, वय ४५ वर्ष, रा. जुना रेल्वे स्टेशन परळी वे जि.बीड ५. प्रेम रावसाहेब वाघमारे, वय १९ वर्ष, रा. नागसेननगर परळी वै जि.बोड ६. संतोष सोपान कांबळे, वय ३० वर्ष, रा मिलींदनगर परळी वै जि. बीड. यांना ताब्यात घेवुन पुढील तपासकामी पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर यांचे ताब्यात देण्यात आले असून त्याचे कडुन पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर व परळी ग्रामीण असे चोरीचे दोन गुन्हे उघड करण्यास स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. यातील चोरीस गेलेले ॲल्युमिनीयम साहीत्य कोणास विकले, कोणाकडे आहे याचा संयुक्तरित्या शोध पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर व स्थानिक गुन्हे शाखा बीड हे घेत आहेत.

सदरील कारवाई ही श्री नवनित काँवत, पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, सुशांत सुतळे, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार मारोती कांबळे, विकास राठोड, विष्णु सानप, नितीन वडमारे व सचिन आंधळे, विकी सुरवसे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी केली आहे. पॉवरग्रीड व कारखाण्यामधील सामान चोरणारी टोळी पकडल्याने चोरीवर आळा बसणार आहे.

# आ.संदीप क्षीरसागर यांचा विरोध केल्याशिवाय बीडमध्ये राजकारण होत नाही

## कार्यकर्त्याला काम मिळवण्यासाठी स्थानिक आ. संदीप क्षीरसागर यांना विरोध करून पालकमंत्री अजित पवारांना खुश करण्याचा प्रयत्न करत आहेत : के के वडमारे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा सध्या कारणामुळे सध्या चर्चेचे ठिकाण बनलेला आहे अशातच सत्ताधारी पक्षाचे अजित पवार गटाचे कार्यकर्ते किंवा काही भाजपचे पदाधिकारी काल रस्त्यावर उतरून उपोषण करून आंदोलन करून आमदार संदीप भैया शिरसागर यांच्या नावाने घोषणा दिले आहेत स्थानिक आमदार आणि त्या आमदार संदीप क्षीरसागर मुळे बीड शहरातील आणि मतदारसंघातील विकास कामे होत नाहीत अशा पद्धतीचा आरोप काही कार्यकर्त्यांनी पदाधिकाऱ्यांनी नेत्यांनी केला वस्तुस्थिती अशी आहे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद हे अजित पवार यांच्याकडे आहेत. या अगोदर पण त्यांच्याच पक्षाच्या नेत्याकडे होतं त्या अगोदर सुद्धा पालकमंत्री पद हे परळीलाच होतं यांच्याच कार्यकाळातील यांच्या शिफारशीनुसार जिल्हा शल्य चिकित्सक असतील कलेक्टर असतील एसपी असतील जिल्हा परिषदेचे सी ओ नगरपालिका मुख्याधिकारी असतील बीड जिल्ह्यातील सर्वच प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि शिफारसी यांच्याच कार्यकाळातील असताना सुद्धा हे अधिकारी काम करत नाहीत अशा पद्धतीचे बोंब या अजित पवार गटाच्या कार्यकर्त्याकडून केलेली काल आम्ही बघितलं मात्र अधिकारी आणि कर्मचारी पालकमंत्री आणि सरकारच्या इशारावर काम करतात कालच्या आंदोलनाकडे आम्ही ते आंदोलन अजित पवार यांच्या विरोधात व सत्ताधारी पक्षाचे विरोधात सत्ताधारी पक्ष लोक करत आहेत त्यामुळे विनाकारण आमदार संदीप क्षीरसागर आणि विरोधी पक्षाला बदनाम करण्याचे




काम काही लोक करत आहेत परंतु बीड मतदार संघामध्ये आणि बीड जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे काम प्रमाणिकपणे करण्याचं काम आमदार संदीप क्षीरसागर यांनी २०१९ ते २०२४ केला आहे त्याची पोहच पावती म्हणून २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत बीड मतदार संघातील जनतेने मतदारसंघाची सेवा करण्यासाठी आमदार संदीप क्षीरसागर यांना निवडून दिला आहे त्यामुळे काही कार्यकर्त्यांच्या पोटात दुखत असल्याने पक्ष नेतृत्वाला खुश करण्यासाठी स्वतःच्या पदरात काम पाडून घेण्यासाठी आणि पक्ष नेतृत्वाला दाखवण्यासाठी कालचा आंदोलन होतं सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पदाधिकाऱ्यांनी कुठलाही अधिकाऱ्याचा त्यांना त्रास होत असेल तर पालकमंत्री मार्फत त्याची बदली करावी किंवा त्याच्यावर कारवाई करावी विरोधी पक्षातील आमदाराकडे बोट करण्यापेक्षा मी मतदार संघातील प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी सत्तेचा उपयोग करावा मात्र सत्तेचा उपयोग हा स्वतःच्या घशात बोगस काम करून पैसे उचलण्यासाठी यांना करायचा आहे आणि अधिकारी त्यांना साथ देत नाहीत त्यामुळे ते वेगवेगळे कारण शोधत आहेत.

बीड मतदारसंघांमधील रस्ता असेल ना आली असेल पिण्याचे पाणी असेल पावसाळ्यापूर्वीची स्वच्छता असेल रस्त्यावरील पथदिवे असतील किंवा बिंदुसरा धरणातून येणारे पिण्याचे पाणी असेल किंवा माजलगाव बॅक वॉटरची पाणीपुरवठा योजना असेल किंवा पावसामुळे होत असलेल्या नुकसान असेल आधी कामासाठी संदीप क्षीरसागर हे रस्त्यावर उतरून काम करत आहेत बीड शहराला प्यायला पाणी नव्हतो तेव्हा एकही नेता रस्त्याने उतरून फिरताना दिसला नाही किंवा सत्ताधारी पक्षातील नेत्यांना काही देणंघेणं नव्हतं सकाळी उठल्यापासून संध्याकाळपर्यंत लोकांमध्ये फिरत आहेत स्थानिक स्वराज्य संस्था जिल्हा परिषद निवडणुकीच्या तोंडावर जागा झालेल्या कार्यकर्त्यांना आम्ही दुर्लक्ष करतो असं प्रसिद्ध दिलेल्या पत्रकात राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सचिव के के वडमारे यांनी म्हटलं आहे.

# गढूळ पाणी आणि आंब्यांमुळे पोटदुखीचे रुग्ण वाढले!

बीड । प्रतिनिधी

मे महिन्यात झालेल्या सर्वदूर पावसामुळे तलावातील पाण्याची पातळी वाढली तसेच पाणी गढूळ झाले. बीड नगर परिषदेकडून नळांना गढूळ पाण्याचा पुरवठा करण्यात येऊ लागला आहे. तसेच पाऊस पडल्यानंतर वेगवेगळ्या जातीचे कलमी आंबे खाल्ल्यामुळे ही अनेकांना पोटदुखीचा त्रास होऊ लागला आहे. म्हणून जिल्हा रुग्णालयासह अनेक सरकारी रुग्णालय तसेच खाजगी रुग्णालयांमध्ये पोटदुखीचे रुग्ण वाढले आहे. ही बाब लक्षात घेता नागरिकांनी सावधानता आणि दक्षता बाळगावी. असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, बीड शहराला बीड नगर परिषदेकडून करण्यात येणारा पाण्याचा पुरवठा आठ ते पंधरा दिवसात करण्यात येत आहे, तोही गढूळ आहे. नळांना येणारे पाणी अक्षरशः माती कालविल्यासारखे येत आहे. उच्चभ्रू लोक पिण्यासाठी घरच्या बोअरचे आर ओ लावलेले फिल्टर पाणी वापरतात तर मध्यमवर्गीय लोक थंड जार चे पाणी वापरतात. मात्र सर्वसामान्य गोरगरिबांना बीड नगर परिषदेकडून करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्यावरच अवलंबून राहावे लागते. आणि तेही अशाप्रकारे गढूळ येत आहे. तेच पाणी पिण्यासाठी वापरले जात असल्याने अनेकांना पोटदुखीचा त्रास होऊ लागला आहे. या त्रासापासून वाचण्यासाठी नागरिकांनी पिण्याच्या पाण्यात त्रुटी फिरवावी. गाळ खाली गेल्यावर ते पाणी पिण्यासाठी वापरावे किंवा पिण्याचे पाणी गरम करून थंड करावे आणि नंतरच पिण्यासाठी वापरावे तसेच यावेळी पाऊस मे महिन्यातच पडला.

पाऊस पडल्यानंतर आंब्यांची चव बदलते तसेच ते खाल्ल्याने कुणाला पचते कुणाला पचत नाहीत. ज्यांना पचते त्यांना तर काही होत नाही परंतु ज्यांना पचत नाही त्यांना मळमळ, पोटदुखी, डोकेदुखी सारखे आजार उद्भवतात. असा त्रास होत असल्यास असे का होत आहे, याचे निरीक्षण करून आंब्यांमुळे होत असेल तर आंबे खाणे टाळावे असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

### विनाअनुदान शाळा कृती समितीच्या नाशिक–मालेगाव पायीदिंडीची शिक्षणमत्र्यांनी घेतली दखल

# मालेगाव पायीदिंडी तात्पुरती स्थगित

बीड । प्रतिनिधी

राज्यातील विनाअनुदानित शाळांना अनुदान व अंशतः अनुदानित शाळांना टप्पा वाढ व १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाची अंमलजावणी करा या मुख्य मागणीसह इतर विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य विनाअनुदान शाळा कृती समितीच्या वतीने नाशिक ते मालेगाव पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या पायी दिंडीची शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दखल घेत कृती समितीच्या शिष्टमंडळाना बोलावून घेत टप्पा वाढीसाठी लागणाऱ्या निधीची तरतूद करण्यासाठी कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांची मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या समवेत मुंबईत बैठक लावतो असा शब्द शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिल्यामुळे कृती समितीच्या वतीने सध्या नाशिक मालेगाव पायी दिंडी स्थगित करण्यात आल्याचं संघटनेचे उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांनी सांगितले. दरम्यान १७ किंवा १८ तारखेला बैठक होणार आहे तत्पूर्वी राज्यातील सर्व शिक्षकांनी मुंबई येथील आझाद मैदानावर उपोषणासाठी आजपासून उपस्थित रहावे असे आवाहन खंडेराव जगदाळे यांनी केले.

राज्यातील विनाअनुदानित शाळेच्या अनुदानासाठी व अंशतः अनुदानित शाळांना टप्पा वाढी संदर्भातील १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाची तत्काळ



अंमलजावणी करा या मुख्य मागणीसह इतर विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य विनाअनुदान शाळा कृती समितीच्या वतीने नाशिक ते मालेगाव पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या पायी दिंडीची शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दखल घेत कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांना बोलावून घेतले. नाशिक जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समिती तसेच सर्व समविचारी संघटनांच्या प्रतिनिधींनी मालेगाव येथे जाऊन विनाअनुदानित शाळाना टप्पावाढ संदर्भात व १४ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाची अंमलजावणी बाबत सखोल चर्चा केली. तसेच ११ जून पासून नाशिक ते मालेगाव पायी दिंडीचे नियोजन केले आहे असे शिक्षणमंत्री भुसे यांना सांगितल्यावर ना. दादा भुसे यांनी तुम्ही पायी प्रवास किंवा आत्मक्लेश करून घेऊ नका. लवकरात लवकर तुमचा प्रलंबित विषय संपेल मी मागील बऱ्याच दिवसांपासून निधीसाठी तजवीज कशी होईल हे बघतो आहे. यावर शिष्टमंडळातील काही पदाधिका–यांनी येत्या पावसाळी अधिवेशनात निधीची तरतूद करा अशी विनंती केली. मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्या समवेत १७ किंवा १८ तारखेला बैठक होणार आहे. तत्पूर्वी राज्यातील सर्व शिक्षकांनी मुंबई येथील आझाद मैदानावर आंदोलनासाठी आजपासून उपस्थित रहावे असे आवाहन खंडेराव जगदाळे यांच्यासह के के अहिरे, बाळासाहेब ढोबळे, अरुण पवार, अनिलदादा निकम, भारत भामरे, अविनाश चौधरी, शरद शेलार, प्रशांत बचाव, संजय आहेर, बोरसे सर, चव्हाण सर, संजय देवरे सर आदींनी केले आहे.

# वरिष्ठ वेतन श्रेणी व निवड श्रेणी प्रशिक्षण मोठया उत्साहात सुरु

घनसावंगी । प्रतिनिधी

घनसावंगी राज्यभरातील इयत्ता पहिली ते बारावी पर्यंत शिकवणाऱ्या प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांनी दोन हजार रुपये भरुन नोंदणी केलेल्या शिक्षकांचे सोमवार दि.०२/०६/२०२५ पासून सुरू झालेल्या वरिष्ठ वेतन श्रेणी व निवड श्रेणी प्रशिक्षणात शिक्षकांची प्रत्येक तासाला हजेरी घेऊन उपस्थिती अपलोड करण्यात आली. डउएठढ पुणे येथून लिंक द्वारे प्रत्येक तासिके नंतर ऑनलाईन चाचणी होणार होती. वेबसाईट चालत नसल्याने लिंक मुळे पहिले दोन दिवस तांत्रिक अडचणींमुळे गोंधळात गेला. परंतु उशिरा उपस्थित झालेले आणि एका तासाभराने पळून गेलेल्या शिक्षकांची नावं डउएठढ कडून वगळण्यात आल्याने त्यांना त्याचा लाभ होणार नसून परत दिवाळी च्या सुट्टी त शिस्तीत प्रशिक्षण पूर्ण करावा लागणार आहे.

शिक्षकांना १२ आणि २४ वर्षांच्या सेवेच्या अनुषंगाने हे प्रशिक्षण शिक्षकांच्या पदोन्नतीशी थेट संबंधित आहे. १० दिवसीय प्रशिक्षण, चाचणी, प्रकल्प, नवोपक्रम, कृतिसंशोधन सादर करुन एकूण ३०० गुणांसाठी परिश्रम घ्यावे लागणार आहे. डउएठढपुणे यांच्या हे प्रशिक्षण संपूर्ण राज्यात एकाच वेळी घेण्याचा निर्णय घेतला, मात्र त्यासाठी




आवश्यक तांत्रिक सुविधा नसल्यामुळे शिक्षकांना गोंधळात टाकले. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जालना कडून या प्रशिक्षणासाठी अंबड घनसावंगी तालुक्यातील एकूण १५८ शिक्षक शिस्तीत उत्साह पूर्ण निसर्ग रम्य वातावरणात अंबड येथील मत्स्योदरी महाविद्यालयात ट्रेनिंग घेत आहे. शिक्षकांचे प्रशिक्षण शिबिर अगदी शिस्त माय वातावरणात अंबड येथील मत्स्योदरी महाविद्यालयात ट्रेनिंग चालू आहे.

अत्यंत शिस्तीत खेळीमेळीच्या वातावरणात सकाळी ९:२० ते ५:२० पूर्ण वेळ उपस्थित राहून प्रशिक्षण पूर्ण होत आहे. एकापेक्षा एक बहादर सुट्ट्या मध्ये बिझी असलेले १२ वर्ष सेवा पूर्ण केलेल्या शिक्षकांना वरिष्ठ वेतन आणि २४ वर्ष पूर्ण करून नावं नोंद केलेल्या शिक्षकांना निवड श्रेणी करिता १० दिवसीय प्रशिक्षण गरजेचं आणि बंधनकारक असल्यामुळे दिवसभरात प्रत्यक तासाला हजेरी घेऊन डउएठढ पुणे येथे पाठविल्या जाते. अनुपस्थित शिक्षकांचे तात्काळ नावं कमी होत असल्यामुळे अनुपस्थित शिक्षकांना वगळण्यात येते.

प्रत्येक तासाला ऑफलाईन हजेरी घेऊन उपस्थिती डउएठढ पुणे कार्यालयाला पाठविले जात असल्यामुळे गैरहजर, अनुपस्थित राहिलेले तसेच अधून मधून पळून जाणाऱ्या शिक्षकांची प्रशिक्षणातून वगळण्यात आले.


# उपसभापती श्रीहरी मोरे यांचेवर शुभेच्छांचा वर्षाव

माजलगाव । प्रतिनिधी



बहुजन विकास मोर्चाचे नेते, माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, बाबुराव पोटभरे यांचे खंदे समर्थक श्रीहरी नाना मोरे यांच्या वाढदिवसानिमीत्त राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील सर्वच मान्यवरांकडुन शुभेच्छांचा वर्षाव झाला तर दिवसभर सत्कार व सोशल मिडीयावरही शुभेच्छांचा धुमाकुळ दिसुन आला अनेकांनी भावी जिल्हा परिषद सदस्य म्हणुन देखील शुभेच्छा दिल्या.

सर्वसामान्यांच्या कुठल्याही कामात अपेक्षेविना तुमचं काम होउन जाईल असं बोलन व ते काम करून घेण हा स्वभाव असल्याने जिल्हाभरात उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांच्या चाहत्यांमध्ये प्रचंड वाढ झालेली आहे. लोक कमावणारा नेता, समाजात देखाव्यासाठी मोठेपणा न करता बहुजन, वंचित, उपेक्षित व सर्वच जाती धर्मातील लोकांच्या कामांना न्याय देण्यासाठी झटणारे मोरे नाना आज लोकप्रिय झाले आहेत. समाजात तुमचं असणारं प्रामाणिक कामं, अन्यायाविरूध्द लढणारा निडर स्वभाव, राजकारणातील भुमिका अशी वैशिष्टे श्रीहरी नाना मोरे यांची आहेत. दि. ७ जुन रोजी वाढदिवसानिमीत्त दिवसभर त्यांचे ठिकठिकाणी सत्कार झाले तर दिवसभर देखील तरूणांसह सर्वच जाती धर्मातील लोकांची त्यांच्या निवासस्थांनी ये जा होती. अनेकांनी भावी जिल्हा परिषद सदस्य म्हणुन देखील मोरे नाना यांना शुभेच्छा दिल्या. पुरूषोत्तमपुरी, सादोळा, केसापुरी, फुलेपिंपळगाव, गंगामसला, खरात आडगाव, कल्याणनगर, लवुळ, राजेवाडी, पुरूषोत्तमपुरी सह तालुक्यातील अनेक गावातील लोकांनी यथोचित सत्कार करत नानांप्रती असलेले प्रेम व्यक्त केले तर किट्टी आडगावात तरूणांनी तर कार्यक्रम घेवुन सत्कार केला. यात राजकीय नेते, कार्यकर्ते, पत्रकार, डॉक्टर, वकील, सर्व स्तरातील सर्व जाती धर्मातील प्रतिष्ठीत नागरिकांनी शुभेच्छा देण्यासाठी व सत्कारासाठी मोठी गर्दी केली होती त्याचबरोबर बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांनी देखील पत्राव्दारे मोरे नाना यांना शुभेच्छा दिल्या.



# मानवी हक्क अभियान बीड जिल्हाध्यक्षपदी राजेश क्षीरसागर यांची निवड

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव येथे दि.८ जुन २०२५ रोजी मानवी हक्क अभियान या संघटनेचे अध्यक्ष प्रा. डॉ. मिलींद आवाड साहेव यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली असून या बैठकीत राजेश क्षीरसागर यांची जिल्हाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. गेली अनेक वर्षे कर्मवीर एकनाथराव आवाड यांच्या सोबत अतिशय सक्रीय व क्रियाशील कार्यकर्ते असे हे व्यक्तिमत्त्व असून त्यांनी दलीत अत्याचार, गायरान जमीनी चे प्रश्न, ऊसतोड कामगार आणी बालकांच्या हक्का संबंधी त्यांनी मागील २० वर्षात अनेक उल्लेखनिय काम केले असल्याचा अनुभव असल्याने संघठनेचे नेते प्रा.डॉ. मिलींद आवाड साहेव यांनी वीड जिल्ह्यातील शेकडो कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत राजेश क्षीरसागर यांची बीड जिल्हाध्यक्ष पदी निवड करण्यात आली.

भविष्यात आपन संविधानाने दिलेले अधिकार व हक्क समाजातील दलित, आदिवासी व इतर सर्व अपेक्षीत घटकांना न्याय मिळण्यासाठी माझा संघर्ष असणार असे या वेळी निवडी प्रसंगी बोलताना त्यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी छगन क्षीरसागर, बाबासाहेव थोरात, विष्णू मूजमले, बंडु लोखंडे, प्रल्हाद दळवी, कचरु कांवळे, राहूल आवाड, महादेव उमाप, बंडू खंडागळे, बबनराव खंडागळे, कपील आडागळे यांच्या सह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# पेरणी पुर्वी शेतकऱ्यांना खत–बियाणे औषधीचा पुरवठा शेतकऱ्यांना वेळेवर करा



परळी । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील परळी शिरसाळा धर्मपुरी बाजार पेटीतील कृषी सेवा केंद्र अंतर्गत दर्जेदार खत बियाणे औषधे शेतकऱ्यांचे उत्पादन वाढीसाठी वेळेवर मिळणे आवश्यक आहे. सध्या डीएपी खते मार्केटमध्ये उपलब्ध नसल्यामुळे ऑन मध्ये विक्री होऊ शकते. वेळेवर युरिया उपलब्ध होत नाही मुद्दाम दुकानदार तुटवडा दरवर्षी निर्माण करत असतात. या सर्व बाबीवर आपलं निमंत्रण व सक्षम टीम कार्यरत असणे आवश्यक आहे. शेतीशी निगडित शेत रस्ते व पादंन रस्ते हा प्रश्नाची वेळेत सोडवणूक करावी. व प्रोटल अंतर्गत नोंदणी झालेल्या बियाणे नियमानुसार शेतकऱ्यांना मिळणे आवश्यक आहे. पण असे होताना दिसत नाही. यासह खरीप पेरणीसाठी शेतकऱ्यांना खत बियाणे जास्तीच्या दारात कृषी सेवा केंद्र वाले शिरसाळा येथील कृषी अधिकाऱ्याने या यावर लक्ष घालण्याची गरज आहे. यावेळी निवेदन देताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष बाबा शिंदे, बाबासाहेब गव्हाणे महाराज, उत्तम दादा माने, प्रमोद किरवले आदीसह मान्यवर उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाद्वारे बीड शहरातील सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, सर्वे नंबर ६६ तरफ गिराम यातील एकूण क्षेत्रफळ २९९.११ चौरस मीटर म्हणजे (३२१८.५ चौरस फूट) असे क्षेत्रफळ असून नामे भागीत्राबाई आप्पासाहेब गोडसे यांच्या नावे असून यांनी विक्री करण्याचा ठराव केला आहे. व त्यामधील क्षेत्रफळात पक्के बांधकाम व दगड माती सहित विक्री करण्याचा ठराव केला आहे. एकत्रित प्लॉटची म्हणजेच २९९.११ चौरस मीटर आहे त्याची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

पूर्वेस:– २० फूट रुंदीचा रस्ता
पश्चिमेस :– ३०फूट रुंदीचा रस्ता
दक्षिणेस :– श्री अभय कुलकर्णी यांचा प्लॉट क्रमांक २ व करमाळकर यांचा प्लॉट क्रमांक ११ आहे.
उत्तरेस:– ३० फूट रुंदीचा रस्ता.
याप्रमाणे चतुर :सीमा आहे.

सदरील या एकत्रित प्लॉट बद्दल कोणाची काही तक्रार, गहाण खत, कर्ज, बक्षीसपत्र, खरेदीखत,चोळी बांगडी, तारण इत्यादी काही असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसातच्या आत आपली हरकत कळवावी. मुदतीनंतर कोणाची काही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. त्यासाठी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

लिहून घेणार
सौ.एस.बी. खोले
९३०७३६९३५७

# आंबेडकर चळवळीतील झुंझार नेतृत्व व समाज भूषण सचिन कागदे यांचा आज वाढदिवस मोठ्या थाटामाटात होणार साजरा

परळी । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील समाज भुषण व परळी चे नगरसेवक मा.सचिन भाऊ कागदे यांना वाढदिवसा निमित्त शुभेच्छा देण्यात आल्या.व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हजारो वर्षापासून अज्ञानाच्या खाईत धर्मवाद जातीयवाद अंधश्रद्धा वाईट रूढी वपरंपरा व गुलामगिरीच्या खाईत सापडलेल्या बहुजन समाजाला आपल्या कर्तुत्वाच्या जोरावर आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर अनेक संघर्ष अनेक लढे उभा करून मानवाला मानव पण नाकारणाऱ्या मनुवादी संस्कृतीला जिवंत गाडण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी जो संघर्ष केला त्या संघर्षाला या इतिहासामध्ये तोड नाही डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी या समाजाला जे योगदान दिलेला आहे त्या योगदानाला या जगात तोड नाही डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतःच्या कुटुंबीयांसाठी काही केले नाही परंतु या समाजासाठी संपूर्ण आयुष्य खर्ची घातले त्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या उपकाराचे ओझे आम्हाला कधीच फेडता येणार नाही त्यांच्या विचारांना नतमस्तक होऊन आम्ही डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील भारत निर्माण करण्यासाठी सदैव प्रयत्नशील आहेत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी या समाजातील तळागाळातील माणसाला वर आणण्यासाठी जो त्या परिश्रम कष्ट केलेले आहे. कागदी कुटुंबीयांनी अनेक वर्षापासून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ जोमाने नीट आणि बीड जिल्ह्यामध्ये चालवण्याचे काम केलेला आहे. अनेक लोकांना घरकुलाचा फायदा मिळवून देण्यासाठी त्यांनी सहकार्य केलेला आहे अनेक गोरगरीब लोकांना घरकुले मिळून देऊन त्यांनी सरकारी योजनांचा सर्वसामान्य माणसाला फायदा करून देण्याचे काम केलेला आहे परळी शहरातील अनेक वस्त्यांमध्ये समाजामध्ये निर्माण झालेले वाद तंटे मिटवण्यासाठी सचिन भाऊ यांनी मेहनत घेतलेली आहे परळी शहर पोलीस स्टेशनमध्ये दलित समाजामध्ये अनेक वेळा त्यांचे निर्माण होतात हे त्यांचे आपापसात समजू त्यानुसार मिटवण्याचे काम देखील त्यांनी केलेला आहे अनेक गोरगरीब लोकांच्या लेकरांना शिक्षण मिळावे म्हणून त्यांना शालेय मदत करण्याचे



काम तसेच गोरगरीब लोकांच्या लेकींचा लग्नाचा प्रश्न सोडवण्याचा काम देखील आदरणीय सचिन भाऊ काकडे यांनी केलेला आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या समाज आहे याची जाणीव ठेवून या समाजाला फुल नाही फुलाची पाकळी म्हणून आपण काहीतरी योगदान दिले पाहिजे आपल्या समाजासाठी २०% दान करण्याची दानत ठेवली पाहिजे म्हणून आदरणीय सचिन भाऊ कागदे यांनी समाजासाठी तन–मन–धनाने काम करण्याचे कार्य सुरू ठेवलेला आहे समाजासाठी कार्य करत असताना अनेक लोकांचा विरोध देखील पत्करावा लागतो अनेक वेळा विनाकारण बदनामी ही पत्करावी लागते राजकीय लोकांच्या रोशाचा बळीही पडावा लागतो तरीपण आपण वाघ येणार समाजासाठी लढले पाहिजे हा मंत्र सांगणारा समाज कार्य करत असताना समाजातीलच काही माणसे आपल्याला विरोध करत असतात आपण लोकांचे किती भलं केलं तरी अनेक लोकांच्या पोटात पोटशुळ उठतो याची जाणीव असतानाही आपण आपलं कार्य चालूच ठेवलं पाहिजे कितीही अडथळे आले कितीही संकटे आली तरी आपण आपलं कार्य सोडायचं नाही हा मंत्र ध्यानात घेऊन सचिन भाऊ कागदे यांनी समाजाच्या भल्यासाठी उन्नतीसाठी प्रगतीसाठी सामाजिक कार्य सुरू ठेवलेला आहे त्याला परळीच्या इतिहासात तोड नाही आदरणीय सचिन भाऊ कागदे यांचं कार्य खरोखरच उल्लेखनीय असं कार्य आहे समाजाच्या हितासाठी सचिन भाऊ कागदे हे २४ तास उपलब्ध आहेत. ज्या ज्या ठिकाणी गोरगरीब सामान्य माणसावर अन्याय अत्याचार होत असेल त्यावेळी त्यांच्या अन्यायाला प्रतिउत्तर देण्यासाठी सचिन भाऊ नेहमीच हजर झालेले आहेत समाजासाठी आपण योगदान दिलेच पाहिजे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेला आपण बेईमान न होता आपल्या समाजाला योगदान दिले पाहिजे समाजाच्या पाठीमागे उभे राहिले पाहिजे हा मंत्र ध्यानात धरून सचिन भाऊ कागदे यांनी वेळोवेळी समाजसेवेसाठी समाजासाठी त्या केलेला आहे समाजासाठी आपण पुढे आलं पाहिजे बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा पुढे नेण्यासाठी आपण कार्यरत झालं पाहिजे या मताचा असलेला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरां चा विचार हा दलित माणसाचा श्वास आहे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हा जरी त्यांचा श्वास आहे आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा जोपर्यंत चंद्र सूर्य तारे आहेत तोपर्यंत ती जिवंत ठेवण्यासाठी प्रत्येक भीमसैनिकांनी पुढे आलं पाहिजे. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराला जो माणूस गद्दार होईल त्या माणसाचे आयुष्यात कधीच चांगलं होणार नाही याची जाणीव ठेवून प्रत्येक माणसाने बाबासाहेबांचा विचार पुढे नेण्याचं काम केलं पाहिजे या मताचा असलेला प्रचंड कट्टर भीमसैनिक भीम आणि बाबासाहेबांची विचारधारा घराघरांमध्ये पोहोचवणारा स्वाभिमानी समाजसेवक आदरणीय सचिन भाऊ कागदेयांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त कोटी कोटी हार्दिक शुभेच्छा जय भीम जय प्रबुद्ध भारत

# पर्यावरण मंत्री असलेल्या पंकजा मुंडेंच्या बीड जिल्ह्यात नदीमध्ये प्लास्टिक पिशव्यांचा डिगारा

# गेवराई शहरातील विद्रूपा नदीला घाणीने घेरले, नगर परिषदेच्या स्वच्छता विभागाचे अधिकारी लूडो गेम खेळण्यात व्यस्त आहे का?

**■ आमदार विजयसिंह पंडित यांनी लक्ष घालण्याची गरज? ■ नगर परिषदेच्या मुख्यधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे नदीने घेतले प्लास्टिक अवतार?**

गेवराई । प्रतिनिधी

विद्रूपा नदी पात्रात घाणीचे साम्राज्य वाढले असून आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.विद्रूपा नदी शहराच्या मध्यवर्ती भागातून वाहत असून नदी पात्राच्या आजुबाजूला लोकवस्ती असुन येथे घाणीचे साम्राज्य झालेले आहे. गेवराई मधून गोविंदवाडी गावाला जोडल्या जाणाऱ्या पुलाखाली एवढी घाण झाली आहे की जे लोक येणं जाणं करतात त्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झालेला आहे मात्र नगरपरिषद डोकावून सुद्धा पाहत नाही नगरपरिषद सफाई कर्मचारी गोठ्या खेळण्यातच व्यस्त आहे का असा सवाल उपस्थित केला जात आहे. नदीजवळ राहणाऱ्या लोकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. नदीत घाण असल्यामुळे मोठ मोठाले ढास निर्माण होतात घाण पाणी झाल्यामुळे जनावरांच्या पण आरोग्याला धोका झालेला आहे नगर परिषद त्या अधिकारी मांडुर के साहेब आल्यानंतर लोकांना दिलासा मिळाला होता आता तरी गेवराई स्वच्छ आणि सुंदर होईल मात्र मांडके साहेब आल्यानंतर तर गेवराई जास्तच घाण झाली असल्याचे चित्र दिसून येत आहे याकडे लोकप्रतिनिधी पण दुर्लक्ष करताना दिसत आहे आमदार विजयसिंह पंडित यांनी तरी याकडे लक्ष घालावे अशी चर्चा रंगू लागली आहे

सध्या ही नदी घाणीमुळे विद्रुप झाली आहे. पावसाळ्यात शहरात स्वच्छता राबवण्यात आल्याचं प्रशासनाकडून सांगण्यात आलं. मात्र विद्रुपा नदीपात्रातील सध्याचे चित्र पाहता खरंच इथं स्वच्छता केली का? असा सवाल उपस्थित होत आहे.'स्वच्छ भारत स्वच्छ शहर'चा नारा देत आपले गेवराई शहर स्वच्छ ठेवण्याकडे शासन-प्रशासनाकडून आवाहन करण्यात येत आहे. शहर स्वच्छतेवर भर देण्यात येत आहे.तसचे पर्यावरणप्रेमींकडून नद्या वाचवण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न करण्यात येतात. मात्र, परिसरातील नागरिक कचरा नदीपात्रात आणून टाकतात. अशा नागरिकांमुळे आणि प्रशासनाच्या दुर्क्षक्षामुळे नदी प्रदूषित होत असून नदीपात्राचे डम्पिंग ग्राऊंड झाल्याचे चित्र आहे. नदीपात्रात मोठ्या प्रमाणात कचरा साठलेला आहे. यामुळे परिसरात कायम दुर्गंधी असते. कचऱ्यासोबतच कॅरिबॅग, रुग्णालयातील इंजेक्शने सुया, एक्सपायर झालेले औषध, स्लाईसच्या बाटल्या, गोळ्यांचे रॅपर असा कचरा देखील नदीत आढळतो.

नदीकाठी शेतकरी जनावरे चरण्यासाठी आणतात. येथील घातक कचऱ्यामुळे मुक्या प्राण्याच्या जिवितालाही धोका आहे. परिसरातील धार्मिक स्थळांनाही त्रास विद्रोपा नदीपात्राच्या बाजूला धार्मिक मंदिर देखील असून मंदिरात येणाऱ्या भाविक भक्तांना कचऱ्याच्या दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. नदी शहरातील मुख्य भागांमधून वाहते, नदीमध्ये वेस्टेज वॉटर सोडणे हे कायद्याने गुन्हा आहे. सर्व शहरातील वेस्टेज वॉटर अर्थात घाण पाणी याच नदीत सोडण्यात येत आहे. नदीतील कचरा व पाणी पूढे बॅक वॉटरला जाऊन मिळतो. जलसंपदा विभागाने लाखो रुपये निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी होत आहे तसेच मात्र सध्या ही नदी घाणीमुळे विद्रुप झाली आहे. नगरपरिषदेच्या अनागोंदी कारभारामुळे नागरिकांना दुर्गंधी आणि आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागते नदीच्या अवघ्या काही अंतरावर अनेक कुटुंब वास्तविक आहेत नदीत मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य पसरले असून दुर्गंधी आणि आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. प्रशासनाने याकडे लक्ष देवून येथील स्वच्छता करावी अशी मागणी स्थानिक नागरिक यांनी केली आहे.



## डॉ.योगेश क्षीरसागर यांनी घेतले प.पू.पंडित प्रदीप मिश्रा यांचे दर्शन



बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या रौप्य महोत्सवानिमित्त बीड तालुक्यातील चाकरवाडी येथे सुरु झालेल्या अखंड हरिनाम सप्ताहात आंतरराष्ट्रीय ख्यातिप्राप्त कथा प्रवक्ते प.पू.पंडित प्रदीप मिश्रा यांच्या शिवपुराण कथेला उत्साहात सुरुवात झाली आहे. त्यांचे कथेच्या दुसऱ्या दिवशी सोमवारी (दि.९) राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दर्शन घेतले. कथेच्या सुरुवातीला ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या उपस्थितीत पूजा पार पडली. त्यांचे देखील आशीर्वाद घेऊन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी कथा श्रवण केली. यावेळी डॉ.क्षीरसागर यांच्यासह भाजपचे नेते नंदकिशोर मुंदडा, डॉ.दिपाताई क्षीरसागर, संतोष सोहनी, शुभम धूत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने भाविकांमध्ये भक्तिभावाचे वातावरण असून, परिसरात अध्यात्मिक ऊर्जा अनुभवता येत आहे.

## पुसरा येथे ५ परस विहीरमध्ये पडलेल्या हरिणाला तरुणांनी दिले जीवदान

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील पुसरा शिवारात घोटभर पाण्यासाठी भटकंती करणारा हरिण शेतकरी नागरगोजे यांच्या शेतातील ५ परस विहीरमध्ये पडल्याची घटना बुधवार दिनांक दि.३० एप्रिल पुसरा येथे घडली. याची माहीती गावातील पत्रकार अविनाश मुजमुले यांना मिळताच वनविभागाचे वनरक्षक देवकांबळे यांना माहिती कळविली. त्यांनी ही तात्काळ घटनास्थळी दाखल होत. एक तास मेहनत घेत काळवीटला जिवदान दिले. वनविभागाच्या कर्मचारी यांच्याकडे हरिणाला सुपूर्द करून हरिणाला जीवदान देऊन माणुसकीचे दर्शन पुसरा येथील तरुणांनी घडवले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी पासुन नऊ कि.मी.अंतरावर असलेल्या पुसरा शिवारात हरीण, मोर, ससे यांसह इतर वन्यप्राणी मोठ्या प्रमाणात आहेत. सध्या उन्हाळ्याची परिस्थिती असल्याने उन्हाचा पारा ४१ अंशांपर्यंत गेला आहे. परिसरातील नदी-नाले कोरडे पडले आहेत. वनविभागाच्या क्षेत्रात वन्य प्राण्यासाठी पाण्याची व्यवस्था नाही. त्यामुळे पाण्यासाठी आसुसलेले वन्यजीव पाण्याच्या शोधात गावाच्या दिशेने येत आहेत. २० ते २५ हरिणांचा कळप पाण्याच्या शोधात गावाच्या दिशेने भटकंती करत फिरत आसताना पुसरा येथील शेतकरी नागरगोजे यांच्या शेतातील ५ परस विहीरमध्ये हारिण पडलेल्या अवस्थेत आढळून आले. याची माहीती शेतकरी नागरगोजे यांनी गावातील पत्रकार अविनाश मुजमुले यांना देताच त्यांनी तातडीने वनविभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती दिली आणि घटनास्थळी तात्काळ भेट दिली. मित्रांना सोबत घेऊन हरिणाला ५ परस विहीरमधुन एक तासांच्या अथक परिश्रम नंतर बाहेर काढण्यात यश आले. व हरिणाचे प्राण वाचवुन माणुसकीचे दर्शन घडवुण आणले.



पाण्याच्या शोधात हे हरिण विहीरीत पडले असावे, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

यावेळी हरिणाला वनविभागाचे कर्मचारी यांच्याकडे सुपूर्त करुन वनपरिक्षेत्रात सोडण्यात आले. यावेळी हरिणाने मोकळा श्वास घेत उड्या मारत वनपरिक्षेत्रात आनंदात निघुन गेले. यावेळी पत्रकार अविनाश मुजमुले, पत्रकार अमोल मुजमुले, ग्रामपंचायत सदस्य बालाजी नागारगोजे, राहुल नागरगोजे, दादा मुजमुले, सह आदीने मोलाचे सहकार्य केले.

वनविभाग कर्मचारी वनपरिक्षेत्र अधिकारी घुनावत यांच्या मार्गदर्शनानुसार वनरक्षक आर.सी. देवकांबळे, वनमजूर एस.आर.मात्रे, मजूर जीवनसिंग, श्याम गायसमुद्रे सह आदी उपस्थित होते. पुसरा परिसरातील नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत आटल्यामुळे वन्यजीव पाण्यासाठी भटकंती करीत आहेत. वनविभागाने अशा तहानलेल्या जिवांसाठी परिसरात पाणवठे तयार करावेत अशी मागणी पुसरा व परिसरातून होत आहे.

**वनविभागाने वनप्राण्यासाठी पुसरा परिसरात पाणीवटे करावेत : अविनाश मुजमुले**

सध्या तालुक्यात उन्हाळ्याचे दिवस असल्याने पुसरा शिवारात व परिसरातील नदी-नाले कोरडे पडले आहेत. हरीण, मोर, ससे यांसह इतर वन्यप्राणी मोठ्या प्रमाणात आहे. घोटभर प्राण्यासाठी वणवण भटंकती करत आहेत. आतापर्यंत मोर, हरिण असे एकूण २७ वणप्राणी यांचे प्राण वाचविले आहेत, व आज आम्ही हरिण वाचविले आहे. वनविभागाकडे वारंवार मागणी करून देखील पाणीवट्टे दिले नाहीत. त्यामुळे वनविभाने तात्काळ परिसरातील वन्य प्राण्यासाठी पाणीवटे बांधुन देण्यात यावे आम्ही पाण्याची व्यवस्था करतो. वन्य प्राण्यांसाठी पाणवठे करणे आज मित्तीला गरजेचे बनले आहे.

# घरकुलासाठीचे पाच ब्रास वाळू पुरवठा टेंडर तालुका स्तरावर तात्काळ सुरु करा

## उपसरपंच अनिल राधे कांबळे यांची तहसील प्रशासनाकडे मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

घरकुलासाठी असलेल्या मोफत पाच ब्रास वाळू पुरवठा टेंडर तालुकास्तरावर सुरू करून त्यात होत असलेला अनागोंदी कारभार थांबवा अन्यथा उपोषण करण्याचा इशारा उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी तहसील प्रशासनाला निवेदनाद्वारे आज दि. १० जून २०२५ रोजी दिला आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, माजलगाव विधानसभा मतदारसंघातील घरकुल लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध न झाल्यामुळे त्यांच्या बांधकाम कामास विलंब होत आहे. घरकुल योजनेंतर्गत प्रत्येक लाभार्थ्यासाठी पाच ब्रास वाळूचा पुरवठा आवश्यक असून सद्यस्थितीत तालुका स्तरावर त्याबाबतचे टेंडर प्रक्रियेस प्रारंभ झालेला नाही. त्यामुळे घरकुल लाभार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक व मानसिक नुकसान होत आहे. तरी माजलगाव तालुक्यात तात्काळ वाळू (पाच ब्रास) टेंडर प्रक्रिया सुरू करण्यात यावी अन्यथा दि.१२/०६/२०२५ पासून आमरण उपोषण करण्याचा इशारा तहसील प्रशासनाला उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी दिला आहे. यावेळी मोतीराम कांबळे, मोहन कांबळे, बाबासाहेब कांबळे, सुखदेव आडागळे,



संजय कांबळे, बंडू आडागळे, अशोक कांबळे, भैया कांबळे, संकेत कांबळे, शाम कांबळे, किरण कांबळे, ज्ञानेश्वर कांबळे, विक्रांत कांबळे, पांडू कांबळे, कल्याण कांबळे, धुराजी आडागळे, प्रदीप कांबळे, शरद कांबळे, सुंदर कांबळे, शरद कांबळे, विकास कांबळे यांची उपस्थिती होती.

## सांगळवाडी -डोळेवाडी -ढिसलेवाडी-दत्तनगर ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी सुनंदा चेपटे यांची बिनविरोध निवड



रायमोहा । प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील व रायमोहा जिल्हा परिषद गटाअंतर्गत येणा-या डोळेवाडी-सांगळवाडी-ढिसलेवाडी-दत्तनगर ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी सौ सुनंदाताई हरिराम चेपटे तर उपसरपंचपदी सौ सुनिता अजिनाथ सांगळे यांची दिनांक ९/०६/२०२५ रोजी बिनविरोध निवड करण्यात आली निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून रायमोहाचे मंडळधिकारी एस यू सानप यांनी काम पाहिले तर रायमोहा पोलीस चौकीचे सारूक साहेब हे बंदोबस्तासाठी हजर होते. सरपंचदी सौ सुनंदाताई हरिराम चेपटे यांची तर उपसरपंचपदी सौ सुनिता अजिनाथ सांगळे यांची निवड होताच फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली व नवनिर्वाचित सरपंच, उपसरपंच यांचे हार, श्रीफळ देऊन पेढा भरून ग्रामपंचायत सदस्य गोरक नवनाथ ढिसले, सौ वंदना सुदर्शन सांगळे, सौ तेजस्विनी बाळकृष्ण ढाकणे, सौ सविता अशोक ढाकणे, सौ सविता अशोक डोळे यांनी पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या नवनिर्वाचित सरपंच सौ सुनंदाताई हरिराम चेपटे व उपसरपंच सौ सुनिता अजिनाथ सांगळे यांना मंत्री पंकजाताई मुंडे, माजी खासदार प्रितमताई मुंडे, भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस सर्जेराव तात्या तांदळे, माजी जिल्हा परिषद सदस्य वैजिनाथराव मिसाळ,रायमोहा जिल्हा परिषद गटाचे नेते गोकुळभाऊ सानप, रायमोहाकर यांनी शुभेच्छा दिल्या.

## गुणवंत विद्यार्थी, शिक्षक, उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शाळांचा आमदार श्री पुरस्कार देऊन गौरव करणार

आष्टी । प्रतिनिधी



जगातील वेगवान घडामोडी अभ्यास आणि नवनवीन आव्हाने पेलण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स, कृत्रिम बुद्धिमत्तेचा शैक्षणिक परिणाम लक्षात घेऊन अभ्यास करावा आणि आपले भवितव्य घडवावे असे मत आ.सुरेश धस यांनी व्यक्त केले. आष्टी येथे अनिशा इंटरनॅशनल स्कूल येथील प्रांगणात तालुक्यातील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांच्या गुणगौरव समारंभ सोहळ्या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून वन विभागामध्ये अधिकारी पदावर नियुक्त झालेल्या अश्विनी परकाळे जरेवाडी पॅटर्नचे संदीप पवार, गटनेते खंडू जाधव, श्रीहरी गीते, जयशिंग गव्हाणे, मा.सरपंच अनिल ढोबळे, विस्तार अधिकारी मनोरंजन धस, चेअरमन मारुती पठाडे, महेश शिंदे, रावसाहेब शिरसाठ आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मनोगत व्यक्त करताना आष्टी, पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील गुणवंत विद्यार्थी त्यांना घडवणारे शिक्षक आणि उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शाळा यांना आगामी वर्षापासून आमदार श्री पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे अशी घोषणा आमदार सुरेश धस यांनी केली. उत्कृष्ट काम करणाऱ्या शाळांसाठी आमदार चषक स्पर्धा सुरू करणार ज्यामुळे गुणवत्तेसाठी स्पर्धा सुरू होईल गुणवंत विद्यार्थी हे देशाचे आधारस्तंभ आहेत त्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात जाऊन स्वत:चे आई वडिलांचे शाळेचे व आपल्या तालुक्याचे नाव उज्वल करावे.

आष्टी तालुका हा गुणवंतांची खाण आहे. यूपीएससी परीक्षेत मतदार संघातील चार विद्यार्थी आयएएस व आयएफएस म्हणून निवडले गेले आहेत आणि या वर्षीच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कारातून पुढील विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी यासाठी या गुण गौरव समारंभाचे आयोजन केले आहे असे प्रतिपादन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भारत हा विश्व गुरु व्हावा यासाठी प्रयत्न सुरू असून त्यासाठी संशोधन क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांनी लक्ष केंद्रित करावे त्याचबरोबर आर्थिक क्षेत्रात प्रगती करण्यासाठी त्याही क्षेत्राचा अभ्यास करण्याची आवश्यकता असून केवळ नोकरीच्या मागे न लागता आपण माणूस म्हणून श्रेष्ठ होण्याचा प्रयत्न करावा आपल्या परिसरातील ऊसतोड कामगारांच्या हातातील कोयता बंद करण्यासाठी आणि त्यांच्या मुलांच्या जीवनात हा प्रसंग येऊ नये यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळा या गोरगरीब विद्यार्थ्यांच्या असल्यामुळे त्या शाळांचे शिक्षण दर्जेदार होण्यासाठी जरेवाडी पॅटर्न राबवण्यास आपण सुरुवातीपासून प्रयत्न केले असल्यामुळे शैक्षणिक गुणवत्तेमध्ये वाढ झाली असून हजारो विद्यार्थी पुन्हा जिल्हा परिषद मध्ये आले आहेत असे सांगितले.

या गुणगौरव कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून तालुक्यातीलच रहिवासी असलेल्या कु.अश्विनी देवराव परकाळे आय.एफ.एस. यांनी स्पर्धा परीक्षे विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना चिकाटी सातत्य आणि गोरगरीब आई-वडिलांना समोर ठेवून कष्ट करावे त्यातून यश प्राप्त होते असा मौलिक सल्ला आ. धस यांनी शेवटी बोलताना दिला. यावेळी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन करून आयएफएस झालेल्या अश्विनी देवराव परकाळे यांनी विद्यार्थ्यांना यशाची गुरुकिल्ली दिली. तसेच अभ्यासातील बारकावे समजावून सांगत सविस्तर मनोगत व्यक्त केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, सुरेश पवार, मनोरंजन धस, सूर्यकांत मोकाशे, महेश शिंदे, आप्पा काळे, सतीश दळवी, सोमनाथ वाळके, विकास धस, दीपक सोले, सचिन रानडे, सोमनाथ भोसले,वाघमारे, नरवडे, संतोष पोकळे, थोरात, जेवे, अनंत्रे, काकडे, लगड, गणेश शिंदे, राजु शिन्दे, ऋषी खिळे, गण प्रमुख अशोक दहातोंडे, शिवाजी थोरात, विलास सिरसाठ, वायभासे, रामदास शेंडगे, राहुल सुरवसे, राजु खुरांगे, अतुल खराडे, भाऊ झांजे, रामेश्वर चव्हाण, बिट्टु पोकळे, संजय पाटील, संजय ढोबळे, अन्सार शेख, ईस्लाम शेख, संदीप कारंजकर, विठठल गर्जे, विजय मरकड, धनंजय तरटे, उद्धव बेंद्रे, खंडुजाधव, शिवाजी घुले, रावसाहेब मुटकुळे, देविदास साप्ते, दत्ता गर्जे, मंजुर शेख, निशांत जेवे, प्रविण झांबरे, किशोर झरेकर आदींनी परिश्रम घेतले. या गुणगौरव सोहळ्याचे सूत्रसंचालन बाळासाहेब तळेकर सर यांनी केले तर आभार प्रदर्शन विस्तार अधिकारी मनोरंजन धस यांनी केले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT